नागरी /ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या
तांत्रिक बदलास मान्यता देणे.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्र. ग्रापापु-१००६/प्र.क्र.३४३/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २४ नोव्हेंबर, २००६**

**वाचा :-** शासन परिपत्रक, पा.पु.व स्व.वि.क्र. संकिर्ण २००६/प्र.क्र.२६/पापु-१०, दिनांक १ जुलै, २००६.

**परिपत्रक :-**

प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेमध्ये नवीन गावे / वाडया यांचा समावेश करण्याबाबतची मागणी आल्यास त्याबाबत काय उपाययोजना करावी व त्याअनुषंगाने योजनेच्या संकल्पनात विशिष्ट प्रकरणी बदल करावे लागल्यास तांत्रिक बदलाच्या प्रस्तावास मान्यता शासन स्तरावरुन घेण्याबाबतच्या सूचना संदर्भीय दिनांक १ जुलै, २००६ च्या परिपत्रकान्वये देण्यात आल्या आहेत. राज्यामध्ये मागणी आधारित समूह सहभागाचे धोरणानुसार ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी होत असून, दि. १.७.२००६ च्या संदर्भीय शासन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचना राज्याने ग्रामीण पाणी पुरवठा योजनांसाठी स्विकारलेल्या समूह सहभागाच्या धोरणाशी सुसंगत नसल्याने, **या परिपत्रकान्वये संदर्भीय दिनांक १.७.२००६ चे शासन परिपत्रक रद्द करुन शासन पुढील प्रमाणे सूचना देत आहे :-**

(१) यापूर्वी पूर्ण झालेल्या प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजनांमध्ये नवीन गावांचा / वाडीचा समावेश करण्यात येवू नये.

(२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रगती पथावर असलेल्या योजनांमध्ये नवीन गावांचा / वाडीचा समावेश करणे अथवा एखादे गाव / वाडी वगळण्याबाबत **निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हास्तरावरील मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखालील समितीस देण्यात येत आहेत. या समितीची रचना पुढील प्रमाणे राहील :-**

| | |
|---|---|
| (१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| (२) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | सदस्य |
| (३) कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.वि., जिल्हा परिषद | सदस्य सचिव |

(३) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर असलेल्या योजनेमध्ये समावेश करण्याबाबतची मागणी गावाकडून / वाडीकडून प्राप्त झाल्यास या समितीने पुढील बाबींचा विचार करुन निर्णय घ्यावा :-

(अ) प्रगतीपथावरील प्रादेशिक योजनेमध्ये एखाद्या गावाचा / वाडीचा समावेश केल्यामुळे त्या प्रादेशिक योजनेत समाविष्टि असलेल्या इतर गावांना निकषानुसार व समान दाबाने पाणी पुरवठा उपलब्ध होवू शकेल काय ?



८३५

(ब) योजनेचे पंपिंगचे तास वाढविण्याची आवश्यकता लागणार नाही.

(क) मागणी आधारित लोकसहभागाच्या धोरणानुसार संबंधित गावचे / वाडीचे लाभार्थी योजनेच्या भांडवली खर्चाच्या १० % रक्कम संबंधित योजनेतील लोकसहभाग म्हणून भरण्यास व योजनेची देखभाल व दुरुस्ती करण्यास तयार आहे काय ?

(ड) गावाचा / वाडीचा प्रगतीपथावरील योजनेत समावेश केल्याने येणारा खर्च व त्या गावासाठी / वाडीसाठी स्वतंत्र योजना घेतल्याने येणारा खर्च यांची तुलना.

(४) नव्याने समावेश होणा-या गावात / वाडीत सर्व लाभार्थ्यांना घरगुती / सामुहिक नळ जोडण्या देण्यात याव्यात.

(५) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर असलेल्या योजनेमधून वगळण्याबाबत एखाद्या गावाने / वाडीने मागणी केल्यास त्या मागणीच्या अनुषंगाने सदर समितीने पुढील बाबींचा विचार करुन निर्णय घ्यावा :-

१. त्या गावाचा / वाडीचा समावेश असलेल्या प्रगतीपथावरील प्रादेशिक योजनेचा पूर्ण होण्याचा संभाव्य दिनांक.

२. सदर गाव / वाडी प्रगतीपथावरील प्रादेशिक योजनेमधून वगळल्याने होणारी बचत व त्या गावासाठी / वाडीसाठी स्वतंत्र योजना घेण्यासाठी येणारा खर्च.

(६) प्रगतीपथावरील प्रादेशिक योजनेत गावाचा / वाडीचा समावेश केल्याने योजनेत होणा-या तांत्रिक बदलास मान्यता देण्यास संबंधित प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हे सक्षम राहतील.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक **२००६११२४१०३४४७००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(संजीव कुमार)**
**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

मा. मंत्री (पा.पु.व स्व.) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (पा.पु.व स्व.) यांचे खाजगी सचिव
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व)
मुख्य कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, (सर्व)
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, (सर्व)



CBE

कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण बांधकाम विभाग, (सर्व)
कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
अवर सचिव / कार्यासन अधिकारी, का. पापु-०६,०९,१०,१३,१७,१,१९,२२ पा.पु.व स्व.वि., मंत्रालय, मुंबई
संगणक कक्ष पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती पापु-०७



C36